लोकमत

# प्रश्नपत्रिकेतील बदलामुळे 'लॉ'ची परीक्षा पुढे ढकलली

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : प्रश्नपत्रिकेच्या स्वरूपातील बदलामुळे शिवाजी विद्यापीठाने तीन आणि पाच वर्षीय विधी (लॉ) अभ्यासक्रमाच्या परीक्षा पुढे ढकलल्या आहेत. या परीक्षा दि. १८ जानेवारीपासून सुरू होतील.

हिंवाळी सत्रातील परीक्षांच्या तारखा यापूर्वी प्रसिद्ध केल्या आहेत. त्यानुसार तीन, पाच वर्षीय 'लॉ' अभ्यासक्रमाच्या परीक्षांचा प्रारंभ आज, शुक्रवारपासून होणार होता. बी.ए., बी.एस्सी., बी.व्होक. अशा विविध ३० पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा गुरुवारी विविध परीक्षा केंद्रांवर झाल्या, अशी माहिती संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

## 'बीए मराठी' पेपरमध्ये चुका

हिवाळी सत्राअंतर्गत बुधवारी बी.ए. मराठी भाग तीनचा पेपर झाला. त्यात प्रश्नपत्रिकेतील तीनपैकी दोन प्रश्न सोडवा, असा उल्लेख होता. मात्र, प्रत्यक्षात दोनच प्रश्न होते. अभ्यासक्रमाबाहेरील काही प्रश्न विचारण्यात आले होते. त्यामुळे पेपर सोडताना आमची अडचण झाल्याचे काही परीक्षार्थींनी सांगितले.

लोकसत्ता

# शिवाजी विद्यापीठाचा भारतीय इतिहास संशोधन परिषदेसमवेत करार

**कोल्हापूर :** भारतीय इतिहास संशोधन परिषदेसमवेत शिवाजी विद्यापीठाचा सामंजस्य करार झाल्यामुळे मराठ्यांचा स्थानिक इतिहास राष्ट्रीयच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय पातळीवर जाण्याचा मार्ग खुला झाला आहे, असे प्रतिपादन नवी दिल्ली येथील भारतीय इतिहास संशोधन परिषदेचे (आयसीएचआर) सदस्य सचिव डॉ. उमेश कदम यांनी सोमवारी येथे केले.

या सामंजस्य करारावर डॉ. कदम यांच्यासह विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी स्वाक्षरी केल्या. डॉ. कदम म्हणाले, मोडी, मराठीसह विविध स्थानिक भाषांमध्ये अद्यापही पुष्कळ इतिहास दडलेला आहे. या करारांतर्गत या इतिहासाचे संशोधन, डिजिटायझेशन करून तो सर्वांना उपलब्ध करून देण्यात येईल. इतिहासच नव्हे, तर सामाजिक शास्त्रे, विज्ञान व तंत्रज्ञान, भाषा, अर्थशास्त्र इत्यादी विविध विद्याशाखांशी निगडित संशोधन प्रकल्पही हाती घेण्यात येतील.

महासत्ता

# पदवी प्रमाणपत्रासाठी अर्ज भरण्यास मुदतवाढ

कोल्हापूर,ता.४(प्रतिनिधी)-

शिवाजी विद्यापीठाच्या ५९ व्या दीक्षांत समारंभाकरिता पदवी प्रमाणपत्र मागणी अर्ज ऑनलाईन भरण्यासाठी १० जानेवारीपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

यापूर्वीच्या निवेदनानुसार विद्यार्थ्यांना रू.३५० शुल्काने अर्ज भरण्याकरिता दि.२९ डिसेंबरपर्यंत मुदत देण्यात आली होती. तथापि, विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार मुदतवाढ देण्यात आली आहे. आता अर्ज भरण्याकरीता ३५० रुपये शुल्कासह ५ जानेवारी आणि ८५० रुपये विलंब शुल्कासह १० जानेवारीपर्यंत ऑनलाईन अर्ज भरता येऊ शकणार आहेत. तरी, ज्या विद्यार्थ्यांनी अद्याप अर्ज दाखल केलेले नाहीत, त्यांनी या विहित कालावधीत अर्ज दाखल करावेत, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ.अजितसिंह जाधव यांनी केले आहे.

06 JAN 2023 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मराठ्यांचा स्थानिक इतिहास जाणार आंतरराष्ट्रीय पातळीवर : डॉ. उमेश कदम

## शिवाजी विद्यापीठाचा भारतीय इतिहास संशोधन परिषदेसमवेत सामंजस्य करार

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

भारतीय इतिहास संशोधन परिषदेसमवेत शिवाजी विद्यापीठाचा सामंजस्य करार झाल्यामुळे मराठ्यांचा स्थानिक इतिहास राष्ट्रीयच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय पातळीवर जाण्याचा मार्ग खुला झाला आहे, असे प्रतिपादन नवी दिल्ली येथील भारतीय इतिहास संशोधन परिषदेचे (आयसीएचआर) सदस्य सचिव डॉ. उमेश कदम यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाची नववर्षाची सुरुवात सामंजस्य कराराच्या कार्यक्रमाने झाली. सामंजस्य करारावर डॉ. कदम यांच्यासह कुलगुरू डॉ.डी.टी. शिर्के, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे यांनी स्वाक्षरी केल्या. शिवाजी विद्यापीठ मातृसंस्था असून संस्थेसमवेत महत्त्वपूर्ण करार करीत असताना अभिमान वाटत असल्याचे सांगून डॉ. कदम म्हणाले, मराठा इतिहास भारताचा मूळ इतिहास आहे. हा इतिहास परकियांनी आपल्याला सांगितला. तथापि, मोडी, मराठीसह विविध स्थानिक भाषांमध्ये अद्यापही पुष्कळ इतिहास दडलेला आहे.

करारांतर्गत या इतिहासाचे संशोधन करण्यात येणार आहे. त्यांचे डिजिटलायझेशन करून तो सर्वांना उपलब्ध करून देण्यात येईल. आजादी का अमृतमहोत्सवानिमित्ताने फेब्रुवारी अखेरपर्यंत स्वातंत्र्ययोद्ध्यांच्या अनुषंगाने तीन व्याख्याने होतील. भारत ही लोकशाहीची जननी असे म्हणत असताना केवळ इतिहासच नव्हे, तर सामाजिक शास्त्रे, विज्ञान व तंत्रज्ञान, भाषा, अर्थशास्त्र आदी विविध विद्याशाखांशी निगडित संशोधन प्रकल्पही हाती घेण्यात येतील. काही महत्त्वाच्या मराठी ग्रंथांचा अनुवाद करून त्यांना राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवर न्यावयाचे असेल तर तसे प्रस्ताव सादर करण्याचीही संधी असेल. या उपक्रमांसाठी प्राथमिक टप्प्यावर १५ लाख रुपयांची तरतूद करण्यात येईल.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, भारतीय इतिहास संशोधन परिषदेसमवेत होणारा विद्यापीठाचा हा पहिला सामंजस्य करार आहे. मराठा इतिहास जागतिक स्तरावर नेण्याची महत्त्वाची संधी आहे. त्यासाठी विद्यापीठाचा इतिहास अधिविभाग व मराठा इतिहास संशोधन केंद्राच्या माध्यमातून ऐतिहासिक साधने व दस्तावेज संस्थेला उपलब्ध करून देण्यात येतील. कार्यक्रमामध्ये नवी दिल्ली आणि बेंगलोर येथील भारतीय इतिहास संशोधन परिषदेचे सर्व सदस्य ऑनलाईन सहभागी झाले होते. मानव्यशास्त्र विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, डॉ. दत्ता मचाले आदी उपस्थित होते. इतिहास अधिविभागाचे प्रमुख डॉ. अवनिश पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. नीलांबरी जगताप यांनी आभार मानले.

06 JAN 2023

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विधी अभ्यासक्रमाच्या परीक्षा पुढे ढकलल्या

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील ३ व ५ वर्षीय विधी अभ्यासक्रमाच्या प्रश्नपत्रिकेच्या स्वरूपातील बदलामुळे दि. ६ जानेवारीपासून सुरू होणारी परीक्षा पुढे ढकलली आहे. आता दि. १८ जानेवारीपासून या परीक्षा सुरू होणार आहेत.



**१८ जानेवारीपासून प्रारंभ; प्रश्नपत्रिका स्वरूपात बदल**

विद्यापीठ परीक्षा विभागाच्या वतीने विधी अभ्यासक्रमाच्या परीक्षा प्रारंभ तारखा यापूर्वी प्रसिद्ध करण्यात आल्या होत्या. विद्यापीठ कार्यक्षेत्रात सात विधी महाविद्यालये असून सुमारे ५ हजार विद्यार्थीआहेत. गेल्या काही दिवसांपासून एमसीक्यू पद्धतीने ६०/४० पद्धतीने परीक्षा घेण्याची मागणी विद्यार्थ्यांनी केली होती. काही विद्यार्थ्यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. मात्र, ही याचिका मागे घेण्यात आली आहे. दरम्यान, अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार प्रश्नपत्रिकेत काही बदल करणे गरजेचे होते. त्यामुळे ६ जानेवारी रोजी सुरू होणाऱ्या विधी अभ्यासक्रमांच्या परीक्षा तारखांमध्ये बदल करण्यात आला आहे.

परीक्षेचे वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर लवकरच प्रसिद्ध केले जाईल, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील ३० अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरळीत

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर-२०२२ हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षांतर्गत गुरुवारी ३० अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरळीत झाल्या. विद्यापीठ परीक्षांना २ जानेवारीपासून सुरुवात झाली आहे. गुरुवारी बीए (ड्रेस मेकिंग अँड फॅशन), बी.व्होक. (ॲग्री), एमएसडब्ल्यू, बी.एस्सी. (संगणकशास्त्र), बीए, बीए -डिफेन्स स्टडी, बीबीए, बीसीए अभ्यासक्रमाच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने विविध महाविद्यालये व अधिविभागामध्ये झाल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

पुढारी

# भगवान महावीर अध्यासनास देणगी

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनाच्या प्रस्तावित इमारत बांधकामासाठी प्रा. चंद्रकांत जनार्दन जोशी यांनी ११ हजार रुपयांची देणगी अध्यासनाचे प्रा. डॉ. विजय ककडे यांच्याकडे सुपूर्द केली.

प्रा. जोशी महावीर महाविद्यालयात प्राध्यापक होते. त्यांनी शिवाजी विद्यापीठातील वाणिज्य व्यवस्थापन विभागामध्ये प्राध्यापक म्हणून काम केले आहे.

पुढारी

# विद्यापीठात कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ जीव रसायनशास्त्र आणि सेंट्रल प्लेसमेंट सेल यांच्या संयुक्त विद्यमाने 'करिअर संधी- बायोमेडिकल सायन्सेस' विषयावर कार्यशाळा झाली. कार्यशाळेत डॉ. निशांत व्यास यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. अधिविभागप्रमुख प्रा. डॉ. के. डी. सोनवणे यांनी प्रास्ताविक केले. कार्यशाळेच्या संयोजिका श्रीमती पी. डी. दांडगे यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली.

आरती कुलकर्णी, निशा नेर्लेकर यांनी सूत्रसंचालन केले. सीमा बुवा यांनी कार्यशाळेचे व्यवस्थापन केले. सेंट्रल प्लेसमेंट सेलचे समन्वयक प्रा. जी. एस. राशीनकर यांचे सहकार्य लाभले. यावेळी डॉ. पी. एम. गुरव, एस. एस. काळे, सहा. प्राध्यापक शैलेश वाघमारे, नईम नदाफ उपस्थित होते.

पुढारी

# कुस्ती स्पर्धेमध्ये वैष्णवी कदम प्रथम

**साळवण :** तिसंगी (ता. गगनबावडा) येथील म. ह. शिंदे



महाविद्यालयातील विद्यार्थिनी वैष्णवी शिवाजी कदम हिने शिवाजी विद्यापीठ अंतरविभागीय महिला कुस्ती स्पर्धेमध्ये ७२ किलो वजन गटामध्ये प्रथम क्रमांक प्राप्त केला. तिची निवड पुणे येथे होणाऱ्या अखिल भारतीय अंतरविद्यापीठ महिला कुस्ती स्पर्धेसाठी झाली आहे. तिला ज्ञानसाधना शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष पी.जी. शिंदे, सचिव स्वप्निल शिंदे, प्र.प्राचार्य डॉ. बी. एस. पडवळ यांचे प्रोत्साहन, तर बाजीराव पाटील यांचे मार्गदर्शन मिळाले.

06 JAN 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## विद्यापीठाच्या परीक्षा विभागाचा निर्णय; अन्य परीक्षा वेळापत्रकाप्रमाणे

# विधि शाखेची परीक्षा १८ जानेवारीला

▸ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ५ : बहुचर्चित विधी शाखेच्या परीक्षेवर अखेर विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने शिक्कामोर्तब केले. ही परीक्षा आता १८ जानेवारीपर्यंत पुढे ढकलण्यात आली आहे. याबाबतची माहिती आज परीक्षा विभागाने जाहीर केली. अन्य विभागांच्या परीक्षा आज नियमित वेळापत्रकाप्रमाणे झाल्या.

विधि शाखेच्या परीक्षांच्या तारखांबद्दल संभ्रम होता. काही विद्यार्थी परीक्षेच्या कारणावरून उच्च न्यायालयातही गेले होते. त्यामुळे विधि शाखेच्या परीक्षा कधी होणार याबाबत विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम होता. काल (ता. ४) विद्यार्थ्यांनी याचिका मागे घेतली. दरम्यान, विधि विभागाच्या परीक्षेबद्दल दोन दिवसांपूर्वी विधी महाविद्यालयांच्या प्राचार्यांची बैठक झाली होती. यामध्ये परीक्षा पुढे ढकलण्याबाबत चर्चा झाली



होती. आज विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने ६ जानेवारीपासून सुरू होणारी विधि शाखेची परीक्षा १८ जानेवारीपासून होणार असल्याचे जाहीर केले.

दरम्यान आज बी.ए. (ड्रेस मेकिंग अँड फॅशन कोऑर्डिनेशन), बी.व्होक (सस्टेनेबन ॲग्रिकल्चर), बी.व्होक (सस्टीनेबल ॲग्रिकल्पच मॅनेजमेंट), एम.एस.डब्ल्यू, बी.व्होक (फुड प्रोसेसिंग टेक्नॉलॉजी) बी.व्होक (नर्सिंग), बी.व्होक (टुरिझम अँड सर्विस इंडसट्री), बी.व्होक ॲटोमोबाईल, बी.व्होक (प्रिंटींग अँड पब्लिशिंग), बी.एस.सी बायोटेक्नॉलॉजी या शिवाय एम.ए., बी.ए., बीबीए, बीसीए या शाखांच्या विविध विषयांच्या परीक्षा झाल्या.

### प्रश्नपत्रिकेत चुका

■ विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील परीक्षेत बुधवारी (ता.४) बी.ए.मराठीच्या तिसऱ्या वर्षाची परीक्षा झाली. यात प्रश्नपत्रिकेत काही चुका होत्या. तीनपैकी दोन प्रश्नांची उत्तरे द्या, असे लिहिले होते. मात्र, प्रत्यक्षात दोनच प्रश्ने होते. आज झालेल्या मराठीच्या प्रश्नपत्रिकेत एका प्रश्नाच्या पर्यायांमध्ये महदंहबा असा पर्याय अपेक्षित होता. त्याऐवजी महदेवा असे छापून आले होते. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला. इंग्रजीच्या प्रश्नपत्रिकेतही गुणांचा घोळ झाला होता, असे विद्यार्थ्यांनी सांगितले.

Times of India

# MoU signed between ICHR & SUK to research local history

Times News Network

**Kolhapur:** The Indian Council of Historical Research (ICHR) and Shivaji University Kolhapur (SUK) have entered into a memorandum of understanding (MoU) for the research into local history and to preserve valuable historical documents.

Umesh Kadam of ICHR said, "Our history is told by foreigners. Maratha's history is the original history of India. We need to tell it again with a scientific approach. The history of Marathas is compiled in Modi script and Marathi. The MoU has one aspect of research. Also, historical records will be preserved using advanced technology such as digitalisation. The translation works of the documents will also be undertaken. The ICHR approves Rs 15 lakh to begin with the important task."

SUK vice-chancellor D T Shirke said the ICHR's researchers will be provided with the books and documents available with the history department and Maratha History Research Centre of the university.